**पोलीस अधीक्षक कार्यालय वाशिम.**
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.07252-234834
ई-मेल-SP.Washim@mahapolice.gov.in.
Website: www.washimpolice.gov.in

## प्रेस नोट

**( दुचाकी गाडीला अनाधिकृत असलेले सायलेन्सरवर व हेल्मेट बाबत कार्यवाही )**

मा.पोलीस अधिक्षक वाशीम श्री बच्चनसिंग साहेब भा.पो.से.यांनी वाशीम जिल्हा पोलीस अधिक्षक पदाचा कार्यभार स्वीकारला तेव्हा पासुन वाहतुक नियमन व नियंत्रण संबंधाने विविध उपाय सांगीतले आहेत. त्यानुसार सरांनी बुलेट गाडीला असलेले अनाधिकृत सायलेन्सरवर कार्यवाही करण्या बाबत आदेशीत केले होते.आदेशा प्रमाणे शहर वाहतुक शाखा येथील सहा.पोलीस निरीक्षक नागेश मोहोड यांनी यासंबंधी विशेष मोहीम राबवून बुलेट गाडीला असलेले अनाधिकृत सायलेन्सरवर कार्यवाही केली असुन सायलेन्सर जप्त करण्यात आलेले आहेत.शहर वाहतुक शाखा वाशीम व वाशीम पोलीस दला कडून सर्व वाहन धारक नागरीकांना आवाहन करण्यात येते की,जो कोणी वाहन धारक वाहनाला कर्कश आवाज करणारे व सायलेन्सर बसवून वाहन चालविताना मिळून येतील त्यांचे वाहन ताब्यात घेवून नियमा प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.तरी बुलेट वाहन धारक यांनी त्यांचे बुलेटला अनाधिकृत सायलेन्सर बसवू नये असे आवाहन करण्यात येत आहे.

वाशीम जिल्ह्यामध्ये सन 2021 मध्ये झालेल्या अपघाता मध्ये एकूण 93लोक मृत्यु मुखी पडले असून त्या पैकी 47 मृत्यु हे हेल्मेट न घातल्याने झालेले आहेत.म्हणजे अपघातामध्ये मृत्यु पावणाऱ्या लोकां पैकी 50% मृत्यु हे हेल्मेट न घातल्याने झालेले आहेत.म्हणजे दुचाकी चालवितांना हेल्मेट घातल्याने जिव वाचु शकतो.जिवन अमुल्य आहे.अपघातात मृत्यु झाल्यास कुटंबाची कधीही न भरुन निघणारी हानी होते.म्हणुन मा.पोलीस अधिक्षक वाशीम श्री बच्चनसिंग साहेब भा.पो.से.यांनी दुचाकीवर हेल्मेट न घालनाऱ्या वाहन धारकावर कडक कायदेशीर कार्यवाही करण्याचे आदेशीत केले आहे.त्याप्रमाणे शहर वाहतुक शाखाने हेल्मेट न घालणारे वाहन धारकावर कार्यवाही करणे सुरु केले आहे.आता पर्यंत 103 हेल्मेट धारन न करणाऱ्या दुचाकी चालकावर कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच जे कोणी पोलीस अधिकारी किंवा अंमलदार हे दुचाकी चालवताना हेल्मेट घालणार नाहीत त्यांचेवर सुध्दा कार्यवाही करण्याचे मा.पोलीस अधिक्षक साहेब यांनी आदेश दिला आहे. तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर करावा.

(स्वाक्षरी)
सहा.पोलीस निरीक्षक
शहर वाहतुक शाखा वाशिम